**गोपनीय**

क्रमांक : का.स./बैठक/२३६

**मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण**
वांद्रे-कुर्ला संकुल, वांद्रे (पूर्व),
मुंबई - ४०० ०५१.

दिनांक : ०३ डिसेंबर, २०१२.

मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाच्या कार्यकारी समितीच्या दिनांक ०९ नोव्हेंबर, २०१२ रोजी झालेल्या २३६व्या बैठकीच्या कार्यवृत्ताची प्रत सोबत पाठवित आहे.

सचिव, 3/12/2012
**कार्यकारी समिती**

**प्रति :**

| | | |
|---|---|---|
| मुख्य सचिव,<br>महाराष्ट्र शासन, मंत्रालय,<br>मुंबई - ४०० ०३२. | - | अध्यक्ष |
| श्री.द.म.सुकथनकर<br>"प्रिया", वरळी सी फेस,<br>वरळी, मुंबई - ४०० ०१८. | - | सदस्य |
| श्री.एन्.व्ही.मिराणी<br>ए/४७, आदर्श नगर,<br>वरळी, मुंबई - ४०० ०२५. | - | सदस्य |
| डॉ.शिरीष संख्ये<br>संचालक, मेकॅन्सी अँड कंपनी,<br>एक्सप्रेस टॉवर, २१ वा मजला,<br>नरिमन पॉईंट, मुंबई - ४०० ०२१ | - | सदस्य |
| प्रधान सचिव (१),<br>नगर विकास विभाग,<br>महाराष्ट्र शासन, मंत्रालय,<br>मुंबई - ४०० ०३२. | - | सदस्य |

...२/-

महापालिका आयुक्त, - सदस्य
बृहन्मुंबई महानगरपालिका,
मुंबई - ४०० ००१.

प्रधान सचिव, - सदस्य
गृहनिर्माण विभाग,
महाराष्ट्र शासन, मंत्रालय,
मुंबई - ४०० ०३२.

व्यवस्थापकीय संचालक, - सदस्य
सिडको,
निर्मल, नरीमन पॉईट,
मुंबई - ४०० ०२१

महानगर आयुक्त - सदस्य
मुं.म.प्र.वि.प्राधिकरण

निमंत्रित :

प्रधान सचिव (२),
नगर विकास विभाग,
महाराष्ट्र शासन, मंत्रालय,
मुंबई - ४०० ०३२.

प्रधान सचिव (उद्योग),
उद्योग, उर्जा व कामगार विभाग,
महाराष्ट्र शासन, मंत्रालय,
मुंबई - ४०० ०३२.

प्रधान सचिव, (विशेष प्रकल्प),
सामान्य प्रशासन विभाग,
महाराष्ट्र शासन,
मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२.

सचिव,
पर्यावरण विभाग,
महाराष्ट्र शासन, मंत्रालय,
मुंबई - ४०० ०३२.

प्रत अग्रेषित :-
विधि सल्लागार, मुं.म.प्र.वि.प्राधिकरण
मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाचे अधिकारी

———xox———

# मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाच्या कार्यकारी समितीची २३६वी बैठक

| | | |
|---|---|---|
| दिनांक | : | ०९ नोव्हेंबर २०१२ (शुक्रवार) |
| वेळ | : | दुपारी ३.०० वाजता |
| स्थळ | : | मुख्य सचिव यांचे समिती कक्ष, (१४७ मुख्य), पहिला मजला मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२. |

**उपस्थित सदस्य :**

| | | |
|---|---|---|
| श्री.जयन्त कुमार बाँठीया<br>मुख्य सचिव,<br>महाराष्ट्र शासन | - | अध्यक्ष |
| श्री.द.म.सुकथनकर | - | सदस्य |
| श्री.ना.वि.मिराणी | - | सदस्य |
| डॉ.शिरिष संख्ये | - | सदस्य |
| श्री. देबाशिष चक्रबर्ती<br>प्रधान सचिव,<br>गृहनिर्माण विभाग | - | सदस्य |
| श्री.सिताराम कुंटे<br>महापालिका आयुक्त,<br>बृहन्मुंबई महानगरपालिका | - | सदस्य |
| श्री.तानाजी सत्रे<br>व्यवस्थापकीय संचालक (अति.कार्यभार),<br>सिडको | - | सदस्य |
| श्री. राहुल अस्थाना<br>महानगर आयुक्त<br>मुं.म.प्र.वि.प्रा. | - | सदस्य |

**निमंत्रित :**

श्री. श्रीकांत सिंह
प्रधान सचिव (२),
नगर विकास विभाग व
प्रधान सचिव (विशेष प्रकल्प) (अति.कार्यभार)
सामान्य प्रशासन विभाग

श्री.एस.व्ही.आर.श्रीनिवास
अति.महानगर आयुक्त (१)/ प्रकल्प संचालक,
मुं.म.प्र.वि.प्राधिकरण

श्रीमती अश्विनी भिडे
अति.महानगर आयुक्त (२),
मुं.म.प्र.वि.प्राधिकरण

श्री.के.एन.पटेल
विधी सल्लागार,
मुं.म.प्र.वि.प्राधिकरण

श्री. सुनिल पिंपळखुटे
वित्त सल्लागार, वित्त व लेखा विभाग,
मुं.म.प्र.वि.प्राधिकरण

श्री.पी.आर.के.मूर्ती
प्रमुख, परिवहन व दळणवळण विभाग,
मुं.म.प्र.वि.प्राधिकरण

श्री. संपतकुमार
प्रमुख, नगर व क्षेत्र नियोजन विभाग,
मुं.म.प्र.वि.प्राधिकरण

श्रीमती उमा अड्डुसुमली
प्रमुख, नियोजन विभाग
मुं.म.प्र.वि.प्राधिकरण

श्री.वि.ग.पाटील
प्रमुख, सामाजिक विकास कक्ष,
मुं.म.प्र.वि.प्राधिकरण

श्री.श.म.सबनीस
मुख्य अभियंता, अभियांत्रिकी विभाग,
मुं.म.प्र.वि.प्राधिकरण

श्री.स.भ.तामसेकर
मुख्य अभियंता, अभियांत्रिकी विभाग,
मुं.म.प्र.वि.प्राधिकरण

श्री.दिलीप कवठकर
सह प्रकल्प संचालक (जनसंपर्क) आणि
उप महानगर आयुक्त (प्रशासन) (अति.कार्यभार),
मुं.म.प्र.वि.प्राधिकरण

श्री.प्र.सि.तायडे
सचिव, कार्यकारी समिती,
मुं.म.प्र.वि.प्राधिकरण

...३/-

बैठकीच्या सुरुवातीस, प्राधिकरणाच्या वतीने मा. मुख्य सचिव व अध्यक्ष, कार्यकारी समिती यांचे महानगर आयुक्त यांनी स्वागत केले.

त्यानंतर, मा. मुख्य सचिव व अध्यक्ष, कार्यकारी समिती यांनी सर्व उपस्थित सदस्यांचे स्वागत केले.

त्यानंतर, विषय पत्रिकेवरील बाबी विचारात घेण्यात आल्या.

**बाब क्र.१ : प्राधिकरणाच्या कार्यकारी समितीच्या दिनांक २८ सप्टेंबर, २०१२ रोजी झालेल्या २३५व्या बैठकीचे कार्यवृत्त कायम करणे.**

कार्यवृत्त कायम करण्यात आले.

**बाब क्र.२ : प्राधिकरणाच्या कार्यकारी समितीच्या दिनांक २८ सप्टेंबर, २०१२ रोजी झालेल्या २३५व्या बैठकीच्या कार्यवृत्तावरील कार्यवाही अहवाल.**

कार्यकारी समितीच्या दिनांक २८ सप्टेंबर, २०१२ रोजी झालेल्या २३५व्या बैठकीच्या कार्यवृत्तावरील कार्यवाही अहवालामधील खालील विषयावर चर्चा करण्यात आली.

बाब क्र.३ : मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणासाठी अत्याधुनिक पध्दतीची कार्यालयीन इमारत व निवासी इमारत बांधणे - मंजूर निविदेवरील वाढीव खर्चास व अतिरिक्त बाबी तसेच कार्यालयीन इमारतीच्या उर्वरित भागाचे / बाबींचे कार्यान्वयन संबंधी मंजूरी मिळणेबाबत.

उपरोक्त विषयावरील कार्यवाही अहवालावर माहिती देताना महानगर आयुक्त यांनी असे सांगितले की, कार्यकारी समितीने निर्देशित केल्याप्रमाणे निवासी व कार्यालयीन इमारतीच्या वाढीव खर्चाबद्दल तपासणी करुन उद्भवलेल्या वाढीव व अतिरिक्त बाबींचे मुद्दे तपासणेकरिता सार्वजनिक बांधकाम विभागातील अधिक्षक अभियंता व प्राधिकरणातील अधिक्षक अभियंता यांची समिती नेमण्यात आलेली असून समितीचा सदर वाढीव खर्चावर सविस्तर अभ्यास प्रगतीपथावर आहे. त्याप्रमाणे लवकरच समिती प्राधिकरणास अहवाल सादर करेल. तसेच कार्यकारी समितीने मार्गदर्शित केल्याप्रमाणे कार्यालयीन इमारतीचे काम वेगाने पूर्ण करण्याच्या दृष्टीकोनातून

कंत्राटदारास जेवढे काम त्यांनी केलेले आहे तेवढ्या कामापोटी देयक अग्रिम म्हणून सद्यःस्थितीत अदा करणेत येईल अशी माहिती महानगर आयुक्त यांनी चर्चेदरम्यान दिली.

त्याचबरोबर उरलेल्या कामांचा आढावा घेऊन श्री.ना.वि.मिराणी, सदस्य, कार्यकारी समिती यांनी त्यांचे अहवालात सुचविल्याप्रमाणे या निविदांतील न झालेली सर्व कामे एकत्र करुन विद्युत व वातानुकुलित कामे आणि अंतर्गत सजावटीची कामे अशा दोन सविस्तर निविदांद्वारे First Right of Refusal प्रस्तावित न करता कार्यन्वित करण्यात येतील असेही महानगर आयुक्त यांनी नमूद केले.

त्यानंतर, कार्यवाही अहवालाची नोंद कार्यकारी समितीने घेतली.

**बाब क्र.३ : मुंबई महानगर प्रदेशात नागरी घनकच-यावर शास्त्रोक्त पध्दतीने प्रक्रिया व प्रक्रियेतून उर्वरित कच-याची भरावभूमीमध्ये विल्हेवाट लावण्यासाठी तळोजा येथील प्रकल्पासाठी प्रवर्तकाची नेमणूक.**

३.१ प्रथमतः अति. महानगर आयुक्त (२) हयांनी तळोजा सामाईक भरावभूमी प्रकल्पाच्या उभारणीसाठी मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाने पार पाडलेल्या अत्यंत महत्त्वाच्या कार्यवाहीवर सविस्तर सादरीकरण केले. सदर सादरीकरणांत त्यांनी हया प्रकल्पासाठीची ठळक वैशिष्टये व प्रकल्प यशस्वीरित्या राबविण्यासाठी महत्त्वाच्या बाबींचा खुलासेवार तपशिल सादर केला. त्यातील प्रकल्प उभारणीच्या दृष्टीने महत्त्वाच्या बाबी, जसे तळोजा येथील १०७ हेक्टर शासकीय जमिनींचा आगाऊ ताबा, "पर्यावरण निपटारा प्रमाणपत्र" (EIA Clearance), निविदा दस्तऐवज तयार करणेबाबत केलेली कार्यवाही सविस्तरपणे विषद केली. तसेच निविदेतील "स्थिर" व "अस्थिर" घटकांनुसार मागविलेल्या टिपिंग चार्जेस आणि केवळ "अस्थिर घटकावर" Wholesale Price Index (WPI) नुसार वाढ २५ वर्षाच्या दिर्घ कालावधीसाठी स्थानिक स्वराज्य संस्थांना कशाप्रकारे किफायतशीर ठरेल हयांचा तपशिल सादर केला. परंतु हया प्रकल्पासाठी शासनाच्या नगर विकास विभागाकडून सामाईक भरावभूमी प्रकल्पात सहभागी होणा-या स्थानिक स्वराज्य संस्थांना बंधनकारक करणे व त्यासाठी "समन्वय कार्यतंत्र" (Intercept Mechanism) शासनाकडून ठरवून त्यासाठी अध्यादेश जारी करणे गरजेचे आहे, हे विषद केले.

..५/-

३.२ अति. महानगर आयुक्त (२) यांनी असेही नमूद केले की, मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाने स्थानिक स्वराज्य संस्थांसमवेत करावयाच्या कराराचा मसूदा (Draft Waste Supply Agreement) तयार केलेला असून, सूचना व अभिप्रायांसाठी स्थानिक स्वराज्य संस्था व नगर विकास विभागास पाठविलेला आहे. त्यांचेकडून प्राप्त अभिप्रायानुसार त्यास अंतिम स्वरुप देण्यात येईल असे सांगितले. त्यानंतर, अति.महानगर आयुक्त (२) यांनी कार्यकारी समितीस विनंती केली की, मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाने निविदा प्रक्रिया अत्यंत पारदर्शक पध्दतीने पूर्ण करुन प्रस्ताव कार्यकारी समितीच्या मान्यतेसाठी सादर केलेला आहे व स्थानिक स्वराज्य संस्थांच्या दृष्टीने हा महत्त्वपूर्ण ठराव असल्याने त्यास कार्यकारी समितीने मान्यता द्यावी व स्थानिक स्वराज्य संस्थांसमवेत करार करण्यासाठी महानगर आयुक्तांना अधिकार प्रदान करावेत.

३.३ चर्चेच्या दरम्यान श्री. द. म. सुकथनकर, सदस्य, कार्यकारी समिती हयांनी खालीलप्रमाणे सूचना केल्या.

अ) सामाईक भरावभूमी प्रकल्प सुविधा सुरु होण्यापूर्वी हया प्रकल्प क्षेत्राच्या बाहेर काही अंतरासाठी म्हणजेच साधारणपणे २०० मीटरचा "Buffer Zone" अथवा "No Development Zone" तयार करावा. त्या क्षेत्रात कोणत्याही बांधकामास परवानगी असणार नाही, हयाची सर्वतोपरी दक्षता घ्यावी. सामाईक भरावभूमी प्रकल्पाचे क्षेत्र हे महानगरपालिका/नगरपालिका हद्दीच्याबाहेर असल्याने त्यावर अतिक्रमणे होणार नाहीत हयाबाबत कशाप्रकारे दक्षता घेता येईल हयाचादेखील विचार व्हावा व त्याप्रमाणे यंत्रणा तयार करावी.

ब) कच-याच्या घटक निर्देशकानुसार (Composition of waste) येणा-या ज्वलनशिलतेप्रमाणे (Combustible content) व जलअंश (Moisture content) प्रमाणाबाबत Incineration तंत्रज्ञानावर आधारित प्रकल्पात भविष्यात विवाद होवू शकतो. त्यासाठी आवश्यक ती दक्षता सुरुवातीपासूनच घ्यावी. तसेच प्रकल्पाच्या प्रवर्तनाची कार्यक्षमता (Operational efficiency) निश्चित करावी व त्याबाबतची हमी घेण्यात यावी.

त्यावर अतिरिक्त महानगर आयुक्त (२) हयांनी असे सूचित केले की, कच-याच्या विश्लेषणावर "नीरी" हया संस्थेने सविस्तर अहवाल तयार केला होता व त्याचा तपशिल

सर्व निविदाकारांना निविदेसमवेत उपलब्ध केला होता. तसेच प्रकल्पाची कार्यान्वीकरण व प्रचलन हयांची संपूर्ण जबाबदारी प्रवर्तकाची असल्याने त्यांचे समवेत करावयाच्या करारात (Concession Agreement) सर्व बाबी समाविष्टीत केलेल्या आहेत.

क) जर ५-६ जागा निवडून सर्व स्थानिक स्वराज्य संस्थांच्या ठिकाणाकडून कचरा त्या जागेवरुन रेल्वेद्वारे वाहतूक केल्यास हा उत्तम वाहतूकीचा पर्याय ठरु शकेल. परंतु त्यासाठी रेल्वे प्रशासनासमवेत चर्चा होणे गरजेचे आहे. यावर अतिरिक्त महानगर आयुक्त (२) हयांनी असे विषद केले की, तळोजा येथील प्रकल्पासाठी रेल्वेद्वारे वाहतूकीच्या पर्यायाबाबत कोकण रेल्वे समवेत अनेक वेळा चर्चा करण्यात आली होती. परंतु तळोजा येथील जागेजवळ कोणतेही रेल्वेचे जाळे नसल्यामुळे हया पर्यायाचा विचार होवू शकलेला नाही.

३.४ डॉ. शिरीष संख्ये, सदस्य, कार्यकारी समिती हयांनी प्रकल्प उभारणीबाबत कार्यान्विकरणासाठी कोणकोणत्या अन्य जोखिमा (Risks) आहेत असे विचारले असता, त्यावर अति.महानगर आयुक्त (२) हयांनी सांगितले की, पाणी व वीज हयांची संबधित पुरवठाधारकांमार्फत उपलब्धता निश्चित करण्यात आलेली आहे. त्याचप्रमाणे प्रकल्प क्षेत्राच्या बाहेरील पायाभूत सुविधांची म्हणजे "प्रवेश मार्गाची" (Approach Road) व्यवस्था मुं.म.प्र.वि.प्रा.कडून करण्यात येणार आहे. तसेच प्रकल्प क्षेत्रात येणा-या दोन शाळांचे व अल्प प्रमाणातील असलेल्या काही घरांचे स्थलांतर अन्य ठिकाणी मुं.म.प्र.वि. प्राधिकरणातर्फे करण्यात येणार आहे ज्यायोगे एक सलग ५० हेक्टर जागा प्रकल्प उभारणीसाठी उपलब्ध होवू शकेल. त्यासाठीची आर्थिक तरतूद बाब टिप्पणीतील अनु. क्र.१० वर दर्शविलेली आहे.

३.५ चर्चेदरम्यान कार्यकारी समितीचे निमंत्रित श्री. श्रीकांत सिंह, प्रधान-सचिव (२), नगर विकास विभाग, हयांनी खालील मुद्दे उपस्थित केले :-

अ) मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाकडे तळोजा येथे १०७ हेक्टर शासकीय जागा हया प्रकल्पासाठी उपलब्ध झालेली आहे. त्यातील ५ हेक्टर खाजगी जागा अधिग्रहीत करावी लागेल. परंतु अधिग्रहीत करावयाच्या जागेसाठीची प्रक्रिया पूर्ण होणे गरजेचे आहे. त्यावेळी अति. महानगर आयुक्त (२) हयांनी असे सांगितले की, प्रकल्प उभारणी

..७/-

चालू करण्यासाठी मुं.म.प्र.वि. प्राधिकरणाकडे १०७ हेक्टर जागा असल्याने प्रकल्प उभारणी शासकीय जागेवर लगेच सुरु करता येईल.

ब) "स्वारस्य अभिव्यक्तीच्या" (EOI) वेळी ३७ निविदाकारांनी भाग घेतला होता व निविदापूर्व बैठकीस २७ निविदाकारांनी प्रतिसाद दिला. परंतु प्रत्यक्षात चारच निविदाकारांनी निविदा सादर केल्या. हा अत्यंत अल्प प्रतिसाद आहे. त्यावर अति. महानगर आयुक्त (२) हयांनी असे विषद केले की, निविदेतील अहर्तेचे निकष हे अत्यंत काटेकोरपणे निश्चित केले होते ज्यायोगे दिर्घ अनुभवी प्रवर्तक उपलब्ध होतील, त्यास राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय अनेक मान्यवर संस्थांनी निविदा सादर करण्यापूर्वी उत्तम त-हेने प्रतिसाद दिला. परंतु आंतरराष्ट्रीय निविदाकारांना योग्य राष्ट्रीय सह-भागीदार उपलब्ध न झाल्याने कित्येक निविदाकार त्यांच्या निविदा सादर करु शकले नाहीत. आंतरराष्ट्रीय निविदाकारांना सुयोग्य निविदाकाराची निवड करण्यासाठी अनेक प्रक्रिया पार पाडाव्या लागतात. म्हणून अशा प्रकल्पात प्रतिसाद अल्प असण्याची शक्यता असते. हया चार निविदांमध्ये देखील अनेक कंपन्याचा समावेश आहे. तळोजा प्रकल्पासाठी निविदा प्रक्रिया व प्रतिसादाबद्दल सविस्तर सादरीकरण कार्यकारी समितीच्या आगामी बैठकीत करण्यात येईल.

क) मे. रामकी एन्व्हायरो इंजिनिअर्स लि. हयाच निविदाकाराने बृहन्मुंबई महानगरपालिकेने त्यांना सुपुर्द केलेले काम अद्याप सूरु केलेले नाही. तरी हया कंपनीबाबतचा कार्यक्षमता अहवाल (Performance Report) बृहन्मुंबई महानगर पालिकेकडून प्राप्त करावा व त्यानंतरच त्यांना हया प्रकल्पांचे काम सुपूर्द करावे.

यावर अति. महानगर आयुक्त (२) हयांनी असे विषद केले की, बृहन्मुंबई महानगरपालिकेने मे. रामकी एन्व्हायरो इंजिनिअर्स लि. हयांना नागरी घनकचरा प्रक्रिया व शास्त्रोक्त भरावभूमी प्रकल्पाचे कोणतेही काम दिलेले नाही. तर त्यांना कचरा संकलन व परिवहनाचे काम देण्यात आले होते असे समजते.

ड) निविदाकारासमवेत करावयाच्या करारानुसार प्रवर्तकास जागा भाडेपटटयावर (Lease) देण्यात येणार आहे व "त्रयस्थांचे हितसंबंध" (Third Party Interest) तयार होऊ नयेत म्हणून कोणत्या तरतूदी आहेत? त्यावर अति. महानगर आयुक्त-२ हयांनी असे

विषद केले की, प्रवर्तकास देण्यात येणा-या जमिनी कर्जपुरवठादारांकडे तारण अथवा गहाण ठेवता येणार नाहीत अशी अट करारामध्ये आहे, परंतु अन्य तरतूदींबाबत सखोल माहिती देण्यात येईल.

इ) मे. रामकी एन्व्हायरो इंजिनिअर्स लि. हयांनी चायना येथील कंपनीसमवेत निविदा सादर केलेली आहे व त्यांना हे काम दिर्घ कालावधीसाठी सुपूर्द करण्यात येणार आहे. त्यामुळे त्या दोन्हीमधील अंतर्गत कराराची प्रकल्प यशस्वीतेच्या दृष्टीने तपासणी होणे गरजेचे आहे.

ई) कल्याण-डोंबिवली महानगरपालिका व ठाणे महानगरपालिका हयांनी नागरी घनकचरा प्रक्रिया प्रकल्पासाठी स्वतंत्रपणे निविदा मागविल्या आहेत. तळोजा येथील प्रकल्पासाठी सहभागी होणा-या हया दोन्ही महानगरपालिकांनी आपला सहभाग काढून घेतल्यास हा प्रकल्प उभारण्यास अडचणी निर्माण होतील. त्यावर अति. महानगर आयुक्त (२) हयांनी असे सुचित केले की, मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाने महाराष्ट्र शासनास तळोजा येथील सामाईक भरावभूमी प्रकल्पात सहभागी होणा-या महानगरपालिका/नगरपरिषदांना स्वतंत्रपणे प्रकल्प उभारणीसाठी निविदा न काढण्याबाबत निर्देश देण्यासाठी कळविलेले होते व माननीय मुख्य सचिवांच्या अध्यक्षतेखाली डिसेंबर, २०११ मध्ये झालेल्या सभेत असे सूचित केले की मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाकडून राबविण्यात येणा-या सामाईक भरावभूमी प्रकल्पाचे अनेक दूरगामी फायदे असल्याने अशा प्रकल्पात सहभागी होणे स्थानिक स्वराज्य संस्थांना अत्यंत फायदेशीर ठरणार आहे.

३.६ महानगर आयुक्त हयांनी असे सांगितले की, दैनंदिन नागरी घनकच-याची शास्त्रोक्त पध्दतीने विल्हेवाट लावण्याची जबाबदारी ही संबंधित महानगरपालिका/नगरपरिषदांची आहे. परंतु त्यांना येणा-या अनेक अडचणींमुळे विशेषतः सुयोग्य जागांच्या अभावी त्यांना दैनदिन कच-याची शास्त्रोक्त पद्धतीने विल्हेवाट लावणे शक्य न झाल्याने मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाने अत्यंत गुंतागुंतीच्या हया प्रकल्पाचे आव्हान स्विकारले आहे. त्या दृष्टीने अद्यापपर्यंतची सर्व कार्यवाही व निविदा प्रक्रिया पूर्ण केलेली आहे. जर त्यांना हया प्रकल्पात स्वारस्य नसल्यास, मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणास प्रकल्प राबविणे अशक्यप्राय ठरेल.

..९/-

३.७ कार्यकारी समितीचे सदस्य श्री. तानाजी सत्रे, व्यवस्थापकीय संचालक, सिडको हयांनी अशी विचारणा केली की, तळोजा येथील प्रकल्पात सिडको तयार असल्यास सद्याच्या कचरा विल्हेवाट सुविधेपासून किती अंतर असेल.

त्यावर अति. महानगर आयुक्त (२) हयांनी असा खुलासा केला की, प्रस्तावित तळोजा प्रकल्पाची जागा अंदाजे ३-४ किलोमीटर असून सिडको व नवी मुंबई येथील कचरा विल्हेवाटीसाठी आणणे सहज शक्य आहे, परंतु हया दोन्हीही ठिकाणी "स्थानांतरण केंद्रे" (Transfer Stations) उभारावी लागतील. त्यासाठी हया दोन्ही संस्थांसमवेत चर्चा करुन हया प्रकल्पासाठी उपलब्ध होणा-या कच-याचे प्रमाण निश्चित करता येईल.

३.८ उपरोक्त चर्चेनुसार मा. मुख्य सचिव व अध्यक्ष, कार्यकारी समिती यांनी नवी मुंबई व सिडको हयांना हया प्रकल्पात सहभागी होण्यासाठी उत्तेजन द्यावे व नागरी घनकचरा विल्हेवाटीसाठी सामाईक भरावभूमी प्रकल्प हा उत्तम पर्याय असल्याने आणि मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाने निविदा प्रक्रिया पूर्ण केलेली असल्याने या महत्वाकांक्षी प्रकल्पासाठी शासनाकडून सर्वप्रकारे पाठिंबा देण्यात येईल असे सूचित केले. त्यानंतर मे. रामकी एन्व्हायरो इंजिनिअर्स लि. हयांचेकडून भारत देशात त्यांनी अन्य ठिकाणी यशस्वीरित्या राबविलेल्या नागरी घनकचरा प्रक्रिया प्रकल्पांच्या माहितीचे सादरीकरण कार्यकारी समितीच्या आगामी बैठकीत करावे असे निर्देश दिले.

**बाब क्र.४ : विस्तारित मुंबई नागरी पायाभूत सुविधा प्रकल्पांतर्गत ठाणे घोडबंदर रस्त्यावरील व पनवेल बसस्थानकासमोर उड्डाणपूल बांधणेच्या कामांच्या सुधारित अंदाजपत्रकीय रक्कमेस मंजूरी प्रदान करण्याबाबत.**

४.१ महानगर आयुक्त यांनी असे सांगितले की, मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणामार्फत दिनांक २४ डिसेंबर, २००७ रोजी झालेल्या १२०व्या बैठकीमध्ये प्राधिकरणाने विस्तारीत एमयुआयपी अंतर्गत रस्त्यांचे बळकटीकरण करणे, पुल बांधणे व उड्डाणपूल बांधणे इ. कामांकरीता ठराव क्र. ११४८ अन्वये रु. १४९३.२६ कोटी रक्कमेस प्रशासकीय मान्यता दिली असून कामे प्रगतीपथावर आहेत. सदर मान्यतेमध्ये ठाणे घोडबंदर रस्त्यावरील कापूरबावडी, मानपाडा, पातलीपाडा व वाघबीळ यासाठी अंदाजित किंमत रु. ९२.०० कोटी

आणि पनवेल बसस्थानकासमोर उड्डाणपूल बांधणे यासाठी अंदाजित किंमत रु.६०.०० कोटी या कामांचा समावेश आहे. सदर कामे महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळ यांचे मार्फत कार्यान्वीत करण्यात येत आहेत. वरील कामांच्या अंदाजपत्रकीय रक्कमेत वाढ झाली असून त्यांच्या सुधारीत अंदाजपत्रकीय किंमतीस मान्यता प्रदान करणे प्रस्तावित आहे.

४.२ महानगर आयुक्त यांनी कापूरबावडी व पनवेल बसस्थानकासमोरील उड्डाणपूल या संदर्भात चर्चा करताना असे सांगितले की, दिनांक २४ डिसेंबर, २००७ रोजी झालेल्या प्राधिकरणाच्या १२०व्या बैठकीत बाब क्र.२० अन्वये कापूरबावडी व पनवेल बस स्थानकासमोरील उड्डाणपूलाच्या कामासाठी मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाने प्रथमतः निधी उपलब्ध करुन दयावा व नंतर महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळाने त्यांच्या टोल वसुलीमधून सदर निधी मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाला परत करावा असा प्रस्ताव प्राधिकरणासमोर सादर केला होता. या विषयावर प्राधिकरणाच्या बैठकीत प्रदिर्घ चर्चा झाल्यानंतर प्राधिकरणाने असे ठरविले की, कापूरबावडी येथील उड्डाणपूल व पनवेल बस स्थानकासमोरील उड्डाणपूल हया कामांसाठीचा खर्च वसूल करण्यासाठी टोल लावण्यात येऊ नये व सदर खर्च प्राधिकरणाच्या निधितून करण्यात यावा परंतू मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण अधिनियम, १९७४च्या कलम २६ व २७ अन्वये प्रकल्पावर केलेल्या खर्चाची वसूली करण्यात यावी.

४.३ महानगर आयुक्त यांनी असे सांगितले की, ठाणे घोडबंदर रस्त्यावर कापूरबावडी येथे उड्डाणपूल बांधणे या कामाची प्रशासकीय मान्यता किंमत रु. ६५ कोटी ही, महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळाने सादर केलेल्या २००५च्या दरानुसार व ३००० मी. लांबीसाठी होती. कामाच्या निकडी नुसार तज्ञ समितीने ३८५० मी. लांबीचा पूल सेगमेंटल बांधकाम पध्दतीने पूर्ण करण्यात येत आहे. यानुसार सदर कामाच्या सुधारित अदांजित खर्च रु. १६६ कोटी असून सदर कामासाठी महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळाने मे.एन.सी.सी.-जे. कुमार (जे.व्ही.) यांची निविदा किंमत रु.१३१.३७ कोटी करीता मंजूर केली आहे. प्रकल्पाच्या कार्यक्षेत्रामध्ये अस्तित्वातील घोडबंदर रस्त्याची रुंदी ४२ मी. होती. तथापि रस्त्याच्या उत्तरेकडील बाजूस ठाणे-भिवंडी मेट्रो रेल्वे प्रकल्पासाठी २० मी. जागा आरक्षित करुन बांधकामाच्या वेळी अस्तित्वातील

वाहतूकीसाठी ३ मार्गिकेच्या रस्त्याची सोय करण्यासाठी सदर रस्त्याचा विकास आराखडयाप्रमाणे ६० मी. रुंदीमध्ये सुधारणा करण्यात आली आहे. रस्त्याच्याकडेची पावसाळी गटारे बांधणे, वाढीव रुंदीतील बांधकामाचे अवशेष उचलणे, मुंबई ते घोडबंदर रोड ही बाजू अस्तित्वातील गोल्डन डाईन उड्डाणपूलाला न जोडता वेगवेगळे खाली उतरविणे त्यामुळे पुलाच्या लांबीमध्ये वाढ, कापूरबावडी चौकातील नाल्यावरुन व नळपाडा पुलावरुन स्टेम व १.० मी. व १.२० मी. व्यासाची पाण्याच्या जलवाहीनीसाठी लोखंडी पूल बांधणे या बाबींवर होणारा अतिरिक्त खर्च यामुळे कामाच्या किंमतीत एकूण रु.२३.५० कोटी एवढा अतिरिक्त खर्च होणार आहे. तसेच सेवावाहीन्या हलविण्याचा खर्च, प्रकल्प सल्लागाराचा खर्च, भाववाढ, आकस्मिक खर्च, महामंडळ सेन्टेज चार्जेस, इत्यादीवर होणारा अतिरिक्त खर्च रु.५८.६५ कोटी एवढा होणार असल्यामुळे कामाची सुधारित किंमत रु. २१४.०० कोटी एवढी अपेक्षित आहे.

४.४ महानगर आयुक्त यांनी पुढे असे सांगितले की, ठाणे घोडबंदर रस्त्यावर मानपाडा, पाटलीपाडा व वाघबीळ येथे उड्डाणपूल बांधणे या कामाची प्रशासकीय मान्यता किंमत रु. २७ कोटी ही ढोबळ अंदाजपत्रकावर आधारित होती. ठाणे महानगरपालिकेच्या आयुक्तांच्या अध्यक्षतेखालीच तज्ञ समितीच्या मान्यतेने तयार केलेल्या कामांच्या आराखडयानुसार कामाची किंमत रु.५९ कोटी आहे. या कामासाठी मे.वालेचा इंजिनिअरींग लिमीटेड यांची रु. ४५.८५ कोटीची निविदा स्विकृत करण्यात आली. कामाच्या निकडीनुसार उड्डाणपूलावर वॉटर प्रुफींग मेंब्रेनचा थर देणे, विद्युत वाहीन्या स्थलांतरीत करणे यावरील अतिरिक्त खर्च रु. ९.५० कोटी तर प्रकल्प सल्लागाराचा खर्च, भाववाढ, आकस्मिक खर्च, महामंडळ सेन्टेज चार्जेस, इत्यादीवर होणारा अतिरिक्त खर्च रु. १७.४० कोटी एवढा होणार असल्यामुळे कामाची सुधारित किंमत रु. ७३ कोटी एवढी अपेक्षित आहे.

४.५ महानगर आयुक्त यांनी पुढे असेही सांगितले की, पनवेल बस स्थानकासमोर उड्डाणपूल बांधणे या कामाची प्रशासकीय मान्यता किंमत रु. ६० कोटी ही ढोबळ अंदाजपत्रकावर आधारीत होती. सदर कामासाठी मे. जे. एम. सी. प्रोजेक्टस लिमीटेड यांची रु. १४४.२७ कोटीची निविदा स्विकारण्यात आली. पनवेल एस टी स्टॅण्ड समोरील वाहतूक अन्य मार्गाने वळविण्यासाठी वळण रस्त्याचे काम व टक्का गांवा समोरील भुयारी मार्ग (सब-वे) बांधण्याचे काम यावर अतिरिक्त

..१२/-

खर्च रु.१३.४६ कोटी तर प्रकल्प सल्लागाराचा खर्च, भाववाढ, आकस्मिक खर्च, महामंडळ सेन्टेज चार्जेस, इत्यादीवर होणारा अतिरिक्त खर्च रु. ४७.२४ कोटी एवढा होणार असल्यामुळे कामाची सुधारित किंमत रु. २१०.९९ कोटी एवढी अपेक्षित आहे.

४.६ सदरील बाब टिप्पणीवरील चर्चे दरम्यान, मा. मुख्य सचिव व अध्यक्ष, कार्यकारी समिती यांनी असे सांगितले की, सदरील कामाच्या किमंतीमध्ये सन २००९ मध्ये वाढ झाली असे निर्दशनास येऊन सुध्दा प्रकरण सुधारीत मंजूरीसाठी सन २०१२ मध्ये सादर करण्यात आले आहे. या दिरंगाई बद्दल मा. मुख्य सचिव व अध्यक्ष, कार्यकारी समिती यांनी नाराजी व्यक्त केली तसेच या पुढे अशी दिरंगाई होणार नाही याची दक्षता घेण्यात यावी अशी सुचना केली.

४.७ श्री. द.म.सुकथनकर, सदस्य, कार्यकारी समिती यांनी निदर्शनास आणले की, सद्यःस्थितीत कामे पुर्णत्वाच्या मार्गावर आहेत. त्यामुळे आकस्मित खर्चाची तरतूद अनावश्यक वाटते. तरी सदर तरतुद सुधारीत अंदाजखर्चामधुन वगळण्याची सुचना केली.

४.८ श्री. ना. वि. मिराणी, सदस्य, कार्यकारी समिती यांनी असे सुचविले की मुळ मंजुर निविदा किंमतीपेक्षा वाढ झालेल्या कामांच्या रक्कमेवर व भाववाढीपोटी कराव्या लागणा-या अदागयीवरही महामंडळास सेंन्टेज चार्जेस देणे योग्य नाही. त्यामुळे महामंडळाचे सेंन्टेज चार्जेस मुळ मंजुर निविदा किंमतीपर्यंत सिमित करण्यात यावी.

४.९ चर्चेअंती, ठाणे घोडबंदर रस्त्यावरील कापुरबावडी, मानपाडा-पातलीपाडा-वाघबीळ व पनवेल बस स्थानकासमोरील उड्डाणपूल या कामांच्या सुधारीत किंमतीस मान्यता प्रदान करण्याबाबतचा कामनिहाय ठराव खालील बदलासह मान्य करण्यात आला.

<u>ठराव क्र.१२१५:</u>

**"असा ठराव करण्यात येत आहे की,** मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण अधिनियम, १९७४च्या कलम ७चे उपकलम (३)चे पोट-कलम (तीन) अन्वये प्राप्त झालेल्या अधिकारांचा आणि याबाबत त्यास सहाय्यभूत होणा-या इतर सर्व अधिकारांचा वापर करुन, कार्यकारी समिती याद्वारे विस्तारित एमयूआयपी अंतर्गत खालील प्रकल्पांची सुधारित किंमत महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळ यांचेकडून प्राधिकरणास परत मिळविण्याच्या

प्राधिकरणाच्या १२०व्या बैठकीतील ठराव क्र.११४८ च्या अधिन राहून खालील प्रमाणे सुधारित अंदाजपत्रकीय किंमतीस मान्यता देण्यात येत आहे.

**अ) कापूरबावडी उड्डाणपूल :-**

| | | | |
|---|---|---|---|
| १. | मंजुर निविदा किंमत | : | रु. १३१.३७ कोटी |
| २. | पावसाळी पाण्याच्या गटारे बांधण्याचा अंदाजित खर्च | : | रु. ५.०२ कोटी |
| ३. | तोडण्यात आलेल्या बांधकामाचे अवशेष हलविण्याचा अंदाजित खर्च | : | रु. १.४९ कोटी |
| ४. | मुंबई व घोडबंदर बाजूचे विस्तारीकरणाचा अंदाजित खर्च | : | रु. १०.९९ कोटी |
| ५. | लोखंडी पूल बांधण्याचा अंदाजित खर्च | : | रु. ६.०० कोटी |
| ६. | सेवावाहीन्या हलविण्याचा खर्च | : | रु. २.५० कोटी |
| ७. | प्रकल्प सल्लागाराचा खर्च | : | रु. ४.७२ कोटी |
| ८. | भाववाढ | : | रु. ३१.४७ कोटी |
| ९. | म.रा.र.वि.म. सेन्टेज चार्जेस मूळ प्रकल्प किमंतीवर (६ %) | : | रु. ३.९० कोटी |
| १०. | प्रकल्पाची सुधारीत किंमत | : | रु. १९७.४६ कोटी |

**ब) मानपाडा, पाटलीपाडा व वाघबीळ उड्डाणपूल :-**

| | | | |
|---|---|---|---|
| १. | मंजुर निविदा किंमत | : | रु. ४५.८५ कोटी |
| २. | वॉटर प्रुफींग मेंब्रेनचा अंदाजित खर्च | : | रु. ०.२६ कोटी |
| ३. | सेवावाहीन्या हलविण्याचा अंदाजित खर्च | : | रु. ९.२४ कोटी |
| ४. | प्रकल्प सल्लागाराचा खर्च | : | रु. २.२१ कोटी |
| ५. | भाववाढ | : | रु. ८.३० कोटी |
| ६. | म.रा.र.वि.म. सेन्टेज चार्जेस मूळ प्रकल्प किमंतीवर (६ %) | : | रु. १.६२ कोटी |
| ७. | प्रकल्पाची सुधारित किंमत | : | रु. ६७.४८ कोटी |

**क) पनवेल बस स्थानकासमोरील उड्डाणपूल:-**

| | | | |
|---|---|---|---|
| १. | मंजुर निविदा किंमत | : | रु. १४४.२७ कोटी |
| २. | सुधारीत निविदा रक्कम | : | रु. १५०.२९ कोटी |
| ३. | पनवेल शहर वळणमार्ग अंदाजखर्च | : | रु. ६.३८ कोटी |
| ४. | तक्का गाव सबवे अंदाजखर्च | : | रु. ७.०८ कोटी |
| ५. | भाववाढ | : | रु. २२.९३ कोटी |
| ६. | प्रकल्प सल्लागार अदागयी | : | रु. ६.१२ कोटी |
| ७. | वाढीव कालावधीसाठीची प्रकल्प सल्लागार अदागयी | : | रु. १.१२ कोटी |
| ८. | म.रा.र.वि.म. सेन्टेज चार्जेस मूळ प्रकल्प किमंतीवर (६ %) | : | रु. ३.६० कोटी |
| ९. | प्रकल्पाची सुधारित किंमत | : | रु. १९७.५२कोटी |

- उपरोक्त सर्व प्रकल्पातील भाव वाढीची प्रतीपूर्ती कंत्राटदाराना कंत्राटीय तरतूदीप्रमाणे प्रत्यक्ष प्रदान केलेल्या रक्कमेनुसार देय राहील.

"असाही ठराव करण्यात येत आहे की, या अनुषंगाने करण्यात येणा-या करारनाम्यातील अटीप्रमाणे देय होणा-या संभाव्य आर्थिक बदलासह अधिदान करण्यास मान्यता देत आहे.

"आणखी असा ठराव करण्यात येत आहे की, वरील ठरावाची अंमलबजावणी करण्यासंबंधी आवश्यक ती पुढील सर्व कार्यवाही करण्यास महानगर आयुक्त यांना याद्वारे प्राधिकृत करण्यात येत आहे."

**बाब क्र.५ : मुलुंड (पश्चिम) येथील आकाशमार्गिका बांधण्याच्या कामावर शिल्लक राहिलेल्या फॅब्रिकेटेड/नॉन फॅब्रिकेटेड साहित्याची "आहे त्या स्थितीत आहे तेथे" विक्री करण्यासाठीची निविदा स्विकारण्याबाबत.**

५.१ महानगर आयुक्त यांनी असे सांगितले की, मे. रामकी इन्फ्रास्ट्रक्चर लि. यांना मुलुंड (पश्चिम) येथील रु. ५४.४७ कोटी एवढया किंमतीची आकाशमार्गिका बांधण्याचे काम, ९ महिन्यांच्या कालावधीत पूर्ण करण्यासाठी, दिनांक ०६ नोव्हेंबर, २००८ रोजीच्या कार्यारंभ आदेशान्वये देण्यात आले होते. कार्यारंभ आदेश प्राप्त होताच कंत्राटदाराने सदरील काम निविदा कालावधीमध्ये पूर्ण करण्याच्या दृष्टीने कामासाठी आवश्यक असणारे साहित्य, यंत्र सामुग्री व मनुष्यबळ कामाच्या ठिकाणी उपलब्ध करुन आकाशमार्गिकेच्या पायाचे काम व फॅब्रिकेशन यार्डमध्ये संकल्पचित्राप्रमाणे लोखंडी साहित्य जोडणीचे काम एकाचवेळी सुरु केले होते.

५.२ महानगर आयुक्त यांनी असेही सांगितले की, सदरील कामाची मागणी स्थानिक आमदार यांनी केली होती. तसेच आकाशमार्गिकेची आखणी सुध्दा त्यांच्या अनुमतीने अंतिम करण्यात आली होती. त्यात स्थानिक विधानपरिषद सदस्य यांनी बदल करुन प्राधान्याने जवाहरलाल नेहरु मार्गावर आकाशमार्गिका करण्याबाबत सूचना केली. प्रत्यक्ष काम सुरु झाल्यानंतर स्थानिक दुकानदार व रहिवाशी यांनी कामाला विरोध करण्यास सुरुवात केल्यामुळे कामास दिनांक २९ मार्च, २००९ पासून तात्पुरती स्थगिती देण्यात आली. स्थानिकांचा विरोध लक्षात घेऊन, विरोधाची कारणे व त्यावरील उपाययोजना करण्याच्या दृष्टीने स्थानिक रहिवाशी, लोकप्रतिनिधी, प्रवासी वाहतूक संघटना व अशासकीय संघटना यांच्या समवेत बैठका घेण्यात आल्या. बैठकीत ठरलेल्या निर्णयानुसार दिनांक १४ ऑक्टोबर, २००९ पासून कामास पुन्हा

..१५/-

सुरुवात करण्यात आली. तथापी आकाशमार्गिकेच्या लगतच्या रहिवाश्यांचा व दुकानदारांचा सदरील कामास विरोध कायमच होता. सदर काम पूर्ण करण्यासाठी कंत्राटदार, प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार व प्राधिकरणाकडून सतत प्रयत्न करुन सुध्दा काम चालू ठेवण्यात यश न आल्यामुळे सदर कंत्राट निविदा कलम १५(१) अन्वये दिनांक १७ मार्च, २०१० पासून रद्द करण्यात आले. दरम्यानच्या काळात कंत्राटदाराने जवाहरलाल नेहरु मार्गावर ५६ पाईल्सचे काम व निविदेतील एकूण लोखंडी काम अंदाजित वजन २९२०.२१ मेट्रिक टन पैकी जे.एन. रोडसाठी आवश्यक असणा-या लोखंडी सांगाडयाचे अंदाजित वजन ५३९.८८ मेट्रिक टनचे काम पूर्ण केले होते. सदरील साहित्य प्राधिकरणाच्या प्रगतीपथावरील असलेल्या अन्य कामांवर वापर करण्याच्या दृष्टीने साहित्याची यादी सर्व संबंधितांना देवून बांधकाम साहित्य त्यांच्या प्रगतीपथावरील कामावर वापरण्याबाबत विनंती करण्यात आली होती. परंतु त्यास प्रतिसाद मिळाला नाही. कामाचे कंत्राटदार मे. रामकी इन्फ्रास्ट्रक्चर लिमिटेड यांनी कामाचे लोखंडी सांगाडे तयार करण्यासाठी शास्त्री नगर, मुलुंड कॉलनी, मुलुंड (पश्चिम) येथे गोदाम भाडयाने घेतले होते त्याच ठिकाणी सदरील साहित्य ठेवण्यात आले आहे. कंत्राटदाराकडून सदरील साहित्य तेथून हलविण्याबाबत प्राधिकरणाकडे पाठपुरावा चालू आहे. तसेच सदरील जागेचे भाडे, विद्युत देयक व साहित्य सांभाळण्यासाठी लावण्यात आलेल्या सुरक्षा यंत्रणेवरील, काम बंद झाल्यापासून गोदाम रिकामे करेपर्यंतच्या खर्चाची मागणी कंत्राटदार प्राधिकरणाकडे करीत आहे.

५.३ चर्चेदरम्यान श्री. ना.वि.मिराणी, सदस्य, कार्यकारी समिती यांनी अशी विचारणा केली की, सदरील साहित्यावर सेक्युअर्ड ॲडव्हान्स दिला असल्यास कंत्राटदाराला जागेचे भाडे, साहित्य सुरक्षा व्यवस्थेचे अदायगी देण्याची आवश्यकता नसावी. यावर निविदेमध्ये सेक्युअर्ड ॲडव्हान्सची तरतूद नसल्याचा खुलासा मुख्य अभियंता श्री. सबनीस यांनी केला. त्यामुळे सदरील साहित्य आहे त्या स्थितीत लिलाव करण्याशिवाय अन्य पर्याय प्राधिकरणाकडे उपलब्ध नसल्यामुळे प्राधिकरणाने सदरील साहित्याची विक्री करण्याचे ठरविले.

५.४ महानगर आयुक्त यांनी पुढे असेही सांगितले की, या कामाचे प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार मे.मोनार्च सव्हेअर्स ॲण्ड इंजिनिअरिंग कन्सल्टन्टस् प्रा.लि. यांनी त्यांच्या दिनांक १० एप्रिल, २०१२च्या पत्रानुसार सदर सामानाची घसारा किंमत रु.१,२१,८२,८८२/- इतकी आहे

असे कळविले होते. सदरील साहित्य "आहे त्या स्थितीत आहे तेथे" विक्री करण्यासाठी ठोस निविदा दिनांक १५ मे, २०१२ रोजी दैनिक 'यशोभूमी', 'आपला महानगर' व 'फ्री प्रेस जनरल' या प्रमुख वृत्तपत्रात मराठी व इंग्रजी जाहिरात देऊन मागविल्या होत्या. तसेच निविदा सूचना प्राधिकरणाच्या संकेत स्थळावरही प्रसिध्द करण्यात आली होती. सदरील कामासाठी एकूण प्राप्त झालेल्या वित्तीय देकाराचा तपशील खालीलप्रमाणे आहे :-

| अ.क्र. | कंत्राटदाराचे नाव | देकाराची रक्कम (रु.) | श्रेणी |
|---|---|---|---|
| १. | मे. सी.एम. ट्रेडींग कंपनी | १,११,११,१११/- | तृतीय |
| २. | मे. जी.एम. ॲण्ड सन्स | १,०१,००,०००/- | न्यूनतम |
| ३. | मे. के.डी. इंटरप्रायजेस | १,०२,००,०००/- | चतुर्थ |
| ४. | मे. इंप्रेशन मेटल वर्कस कॉर्पोरेशन | १,२५,००,०११/- | व्दितीय |
| ५. | मे. सायन स्टिलस | १,३३,००,०००/- | उच्चतम |

५.५ महानगर आयुक्त यांनी पुढे असेही सांगितले की, सदरील निविदेच्या शर्तीनुसार लिलावाच्या देकारावर अतिरिक्त ५% वॅट व १% टी.सी.एस. सह १००% रक्कम स्विकृती पत्र मिळाल्यापासून सात दिवसाच्या आत भरणे आवश्यक आहे. तसेच शासनाच्या नियमानुसार काही स्थानिक कर, विक्री कर व त्यावरील उपकर इ. सुध्दा लागू असल्यास निविदाकाराने स्वतंत्रपणे भरावयाचे आहेत. तसेच साहित्य चढविणे, उतरविणे, त्याची वाहतूक करणे व त्याच्या वजनाच्या खातरजमेसाठी कराव्या लागणा-या व्यवस्थेचा खर्च निविदाकाराने करावयाचा आहे. अंतिमतः उच्चतम देकाराची रक्कम जागेवर प्रत्यक्ष मिळणा-या सामानाच्या परिणामानुसार समायोजित करण्यात येईल. मे.सायन स्टिलस् यांना उच्चतम रु. १,३३,००,०००/- या देकाराच्या किंमती व्यतिरिक्त कंत्राटदारास ५% वॅट (रु.१,३३,००,०००/-) वर १% टी.सी.एस. (रु.१,३३,००,०००/- + वॅट) धरुन एकूण रु. १,४१,०४,६५०/- एवढी रक्कम अदा करावी लागेल. अतिरिक्त महानगर आयुक्त (२) यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या दिनांक १४ ऑगस्ट, २०१२ रोजीच्या प्राधिकरणाच्या निविदा समितीच्या बैठकीत केलेल्या सुचनेनुसार सदर साहित्याचे मूल्यांकन अधीक्षक अभियंता, मुंबई सार्वजनिक बांधकाम मंडळ, मुंबई यांनी त्यांच्या दिनांक २८ सप्टेंबर, २०१२ रोजीच्या पत्रा नुसार करुन दिले व सदर साहित्याची सध्याची किंमत

..१७/-

रु. १,३४,०३,५०६/- इतकी निश्चित केली आहे, जी उच्चतम देकाराच्या रक्कमेपेक्षा कमी आहे. निविदा समितीच्या उपरोक्त बैठकीत सदर उच्चतम देकार मूल्यांकनापेक्षा अधिक असल्यास निविदा स्विकृत करण्याची शिफारस करण्यात आली होती. त्यामुळे सदरील निविदा स्विकृत करण्याबाबत कार्यकारी समितीस विनंती आहे.

५.६ त्यानंतर, बाब टिप्पणीतील प्रस्तावास मान्यता देऊन कार्यकारी समितीने पुढील ठराव मंजूर केला.

ठराव क्र.१२१६ :

"असा ठराव करण्यात येत आहे की, मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण अधिनियम, १९७४च्या कलम ७चे उपकलम (३)चे पोट-कलम (तीन) अन्वये प्राप्त झालेल्या अधिकारांचा आणि याबाबत त्यास सहाय्यभूत होणा-या इतर सर्व अधिकारांचा वापर करुन, कार्यकारी समिती याद्वारे मे. सायन स्टिल्स् यांची रु.१,३३,००,०००/- किंमतीची मुलुंड (पश्चिम) येथील आकाशमार्गिका बांधण्याच्या कामावर शिल्लक राहिलेल्या फॅब्रिकेटेड/नॉन फॅब्रिकेटेड साहित्याची "आहे त्या स्थितीत आहे तेथे" विक्री करण्यासाठीची उच्चतम निविदा स्विकारण्यास मान्यता देत आहे.

"असाही ठराव करण्यात येत आहे की, या अनुषंगाने करण्यात येणा-या करारनाम्यातील अटींप्रमाणे देय होणा-या संभाव्य आर्थिक बदलासह अधिदान करण्यास मान्यता देत आहे.

"आणखी असा ठराव करण्यात येत आहे की, वरील ठरावाची अंमलबजावणी करण्यासंबंधी आवश्यक ती पुढील सर्व कार्यवाही करण्यास महानगर आयुक्त यांना याद्वारे प्राधिकृत करण्यात येत आहे."

**बाब क्र.६ : संत गाडगे महाराज चौक - वडाळा - चेंबूर या छन्नमार्गावर सार्वजनिक वाहतूक यंत्रणेच्या अंमलबजावणीसाठी नियुक्त करण्यात आलेल्या प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार मे.लुईस बर्जर ग्रुप यांना वाढीव मुदत आणि त्यासाठी सुधारीत खर्चास मान्यता मिळणेबाबत.**

६.१ या विषयावर माहिती देताना महानगर आयुक्त यांनी असे सांगितले की, मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाच्या कार्यकारी समितीच्या दिनांक १६ ऑक्टोबर, २००८ रोजी

झालेल्या २२५व्या बैठकीत ठराव क्र. ११९० अन्वये २० कि.मी. लांबीच्या संत गाडगे महाराज चौक - वडाळा - चेंबूर मार्गिकेवर मोनोरेल प्रकल्प राबविण्यासाठी लार्सन ॲन्ड टुब्रो आणि स्कोमी इंजिनिअरिंग, बीएचडी मलेशिया समुहाची कंत्राटदार म्हणून रु. २४६० कोटी (कर वगळून) या रक्कमेवर नियुक्ती करण्यास मंजूरी देण्यात आली असून मोनोरेल प्रकल्पाच्या कामास दिनांक १४ नोव्हेंबर, २००८ रोजी सुरुवात झाली. सदर प्रकल्प दोन टप्प्यांमध्ये राबविण्यात येत आहे. सुधारित वेळेपत्रकानुसार टप्पा-१ नोव्हेंबर, २०१२ पर्यंत प्रवाशांसाठी खुला होणे अपेक्षित असून टप्पा - २ नोव्हेंबर, २०१३ पर्यंत पूर्ण होणे अपेक्षित आहे.

६.२ महानगर आयुक्त यांनी असेही सांगितले की, दिनांक २८ मे, २००९ रोजी झालेल्या कार्यकारी समितीच्या २२७व्या बैठकीत ठराव क्र. ११३१ अन्वये रु.३५,११,५०,०००/- अधिक सेवा कर एवढया रक्कमेवर मे. लुईस बर्जर ग्रुप + आर्कीटेक्चरल ॲन्ड इंजिनिअरिंग इनोव्हेशन ब्युरो या कंपनीस प्रकल्प व्यवस्थापन आणि प्रुफ चेकिंग सल्लागार म्हणून नेमणूक करण्यास मान्यता देण्यात आली होती. सदर प्रकल्पाच्या करारनाम्यानुसार बांधकामाचा कालावधी ३० महिने इतका असून प्रकल्प माहे मे, २०११ अखेर पर्यंत पूर्ण होणे अपेक्षित होते. करारानुसार प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार यांची नियुक्ती जून, २००९ पासून ३० + ३ (3 months without additional fees) = ३३ महिने गृहीत धरता, प्रकल्प व्यवस्थापन व प्रुफ चेकिंग सल्लागार यांचा कार्यकाळ फेब्रुवारी, २०१२ पर्यंत होता. सदर कालावधीमध्ये सल्लागाराचे देयक यथाप्रमाण (pro-rata basis) तत्वावर आधारित असून त्याप्रमाणे देयके अदा करण्यात आली आहेत. परंतु काम पूर्ण करण्यास येणा-या अडचणी लक्षात घेता प्रकल्प व्यवस्थापन व प्रुफ चेकिंग सल्लागार यांचा कार्यकाळ माहे फेब्रुवारी, २०१४ पर्यंत वाढविण्याकरिता प्रस्ताव सादर करण्यात आलेला आहे.

६.३ महानगर आयुक्त यांनी असेही सांगितले की, मे. लुईस बर्जर ग्रुप यांनी प्रत्यक्ष मनुष्यबळाप्रमाणे (Actual Man Month basis) प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार म्हणून २४ महिन्यांसाठी रु.४५,५०,६५,०००/- इतक्या रक्कमेचा प्रस्ताव सादर केला. सल्लागाराने सादर केलेला अतिरिक्त रक्कमेचा प्रस्ताव जास्त असल्याने सदर प्रस्तावाची छाननी करण्याचे प्राधिकरणाने ठरविले. त्याप्रमाणे दिनांक २९ ऑगस्ट, २०१२ रोजी महानगर आयुक्त यांच्या

मान्यतेने त्रिसदस्यीय समिती स्थापन करण्यात आली असून सदर समितीमध्ये वित्तीय सल्लागार, वित्त व लेखा विभाग, प्रमुख, परिवहन व दळणवळण विभाग आणि संचालक, मोनोरेल यांचा समावेश आहे. सदर समितीच्या दिनांक १४ सप्टेंबर, २०१२ आणि दिनांक १७ सप्टेंबर, २०१२ रोजी झालेल्या बैठकीमध्ये Key Professional, Support Staff आणि Logisticsच्या दरपत्रकावर सखोल चर्चा करण्यात आली. पूर्वीच्या करारनाम्यामध्ये नियोजन व संकल्पचित्र यांचा समावेश असल्याकारणाने पूर्ण वेळ अधिका-यांची गरज भासत नव्हती, परंतु सध्या मोनोरेलच्या दोन्ही टप्प्यांचे काम एकाचवेळी प्रगतीपथावर असल्याकारणाने Key Professionals व Support Staff यांची पूर्ण वेळेकरिता गरज पाहता कमीतकमी २५ अधिकारी (सर्व यंत्रणा मिळून) २४ महिन्यांकरिता कार्यरत असणे जरुरीचे आहे. समितीने अशी शिफारस केली आहे की, प्रकल्पाच्या वाढीव कालावधीकरिता प्रकल्प सल्लागाराला ७०% फी प्रत्यक्ष मनुष्यबळानुसार (Actual Man month basis) आणि ३०% फी, ही प्रकल्पाच्या वित्तीय प्रगतीनुसार देण्यात यावी. सदर फी मध्ये प्रकल्पाच्या Proof Checkingच्या कामाचा समावेश असून, पाहणीकरिता (Inspection) लागणारा खर्च समाविष्ट आहे. Key Professional यांचे दर सारखे असून पूर्वीच्या कंत्राटाप्रमाणे Support Staff ५० मनुष्यबळ होते व त्याचा खर्च रु. ५.२५ लाख दरमहा होता. आता Support Staff ची गरज मोठया प्रमाणात असल्यामुळे १६९ मनुष्यबळाची आवश्यकता आहे त्यामुळे हा खर्च खूपच वाढला असल्यामुळे यांचे दर कार्यकारी समितीच्या दिनांक १० जुलै, २०१२ रोजी झालेल्या २३४व्या बैठकीत मेट्रो लाईन - १ च्या मंजूर करण्यात आलेल्या दरपत्रकानुसार ठेवण्यात आले आहेत. मंजूर करण्यात आलेल्या दराने Support Staff चा अपेक्षित खर्च रु. १,८७,५००/- दरमहा याप्रमाणे प्रस्तावित करण्यात आला आहे. मे. लुईस बर्जर ग्रुप आय. एन. सी. (USA) ही सल्लागार कंपनी मेट्रो लाईन - १ चे काम करीत आहे. या सर्व गोष्टींचा विचार करुन त्रिसदस्यीय समितीने याद्वारे मे. लुईस बर्जर ग्रुप आय. एन. सी. (USA) यांची माहे मार्च, २०१२ ते माहे फेब्रुवारी, २०१४ (२४ महिने) या वाढीव कालावधीकरिता रु.३३,००,००,९०९/- इतक्या रक्कमेसाठी शिफारस केलेली आहे.

६.४ सदर विषयावर बोलताना मुख्य सचिव व अध्यक्ष, कार्यकारी समिती आणि इतर सदस्य यांनी अशी विचारणा केली की, सदर सल्लागाराच्या करारनाम्यात वाढीव कार्यकाळासाठी

..२०/-

तरतुद आहे का? तसेच कार्यकाळ पुढे अजून वाढवायचा असेल तर त्याचीही तरतुद केली आहे का?

या विषयावर माहिती देताना प्रमुख, परिवहन व दळणवळण विभाग यांनी असे सांगितले की, मोनोरेलच्या सल्लागार मे. लुईस बर्जर ग्रुप + आर्कीटेक्चरल ॲन्ड इंजिनिअरिंग इनोव्हेशन ब्यूरो या कंपनीच्या सल्लागाराच्या करारनाम्यात असा उल्लेख आहे की,

"प्रकल्पाचा कालावधी ३० महिने + तफावत कालावधी ३ महिन्यापेक्षा जास्त असल्यामुळे त्या कालावधीकरिता लागणारी अधिक फी सल्लागारांना लागणा-या मनुष्यबळ यावर अवलंबून राहील आणि त्या अधिक फी करिता मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाची पूर्व परवानगी घेणे आवश्यक आहे. तसेच २४ महिन्यांपेक्षा अधिक कालावधीकरिता सल्लागाराच्या सेवेत वाढ करण्याची गरज भासल्यास करारनाम्यात योग्य तरतुद करण्यात येईल."

६.५ तद्नंतर, बाब टिप्पणीतील प्रस्ताव मान्य करुन कार्यकारी समितीने पुढील ठराव मंजूर केला :-

<u>ठराव क्र.१२१७:</u>

"**असा ठराव करण्यात येत आहे की,** मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण अधिनियम १९७४च्या कलम ७चे उपकलम (३)चे पोट-कलम (तीन) अन्वये प्राप्त झालेल्या अधिकारांचा वापर करुन, कार्यकारी समिती याव्दारे मुंबई मोनोरेल प्रकल्प - संत गाडगे महाराज चौक - वडाळा - चेंबूर या कामाकरिता नेमणूक केलेल्या प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार मे.लुईस बर्जर ग्रुप, आय. एन. सी. (USA) यांना माहे मार्च, २०१२ ते माहे फेब्रुवारी, २०१४ या २४ महिन्याच्या वाढीव कालावधीकरिता मान्यता देत आहे. तसेच सदर वाढीव कालावधीतील रु. ३३,००,००,९०९/- अधिक सेवा कर इतक्या खर्चास मान्यता देत आहे.

"**असाही ठराव करण्यात येत आहे की,** वरील ठरावाची अंमलबजावणी करण्यासंबंधी आवश्यक ती पुढील सर्व कार्यवाही करण्यास महानगर आयुक्त यांना याव्दारे प्राधिकृत करण्यात येत आहे."

**बाब क्र.७ :** **प्राधिकरणाच्या दिनांक ३० सप्टेंबर, २०१२ रोजी संपणाऱ्या त्रैमासिक कालावधीचे लेखे.**

महानगर आयुक्त यांनी प्राधिकरणाच्या दिनांक ३० सप्टेंबर, २०१२ रोजी संपणाऱ्या त्रैमासिक लेख्यांबाबत संक्षिप्त माहिती दिली, त्यानंतर, प्राधिकरणाच्या त्रैमासिक लेख्यांची नोंद घेऊन लेख्यांस कार्यकारी समितीने मान्यता दिली.

**पटल बाब क्र.१ :** **पूर्व मुक्त मार्गाच्या (Eastern Freeway) भाग पांजरपोळ जंक्शन ते चेंबूर मानखुर्द जोडरस्ता या मार्गासाठी कामाच्या वावामध्ये झालेल्या बदलास व सुधारित खर्चास मंजूरी मिळणेबाबत.**

या बाब टिप्पणी संदर्भात माहिती देतांना महानगर आयुक्त यांनी असे सांगितले की, मुंबई नागरी परिवहन प्रकल्पाचा एक भाग म्हणून पूर्व मुक्त मार्गाचे काम हाती घेण्यात आले आहे. पूर्व मुक्त मार्गाची एकूण लांबी २४.३० कि.मी. असून कामाच्या सोयीसाठी त्याची ३ टप्प्यात विभागणी केली गेली आहे व हया कामांची सद्यस्थिती खालीलप्रमाणे आहे :-

| | | | |
|---|---|---|---|
| भाग पहिला : | म्युझियम ते शिवडी ते आणिक | : | या १२.२० कि.मी. लांबीच्या रस्त्याचे काम प्रगतीपथावर आहे. |
| भाग दुसरा : | आणिक ते पांजरपोळ | : | या ५ कि.मी. लांबीच्या रस्त्याचे काम प्रगतीपथावर आहे. |
| भाग तिसरा : | पांजरपोळ जंक्शन ते चेंबूर मानखुर्द | : | या ५.१० कि.मी. लांबीच्या रस्त्याचा कामापैकी पांजरपोळ जंक्शन ते चेंबूर मानखुर्द जोडरस्त्यापर्यंतच्या २.५ कि.मी. लांबीच्या रस्त्याचे काम प्रगतीपथावर आहे. |

महानगर आयुक्त यांनी असेही सांगितले की, कार्यकारी समितीच्या २२९व्या बैठकीत मे.जे.कुमार इन्फ्राप्रोजेक्टस् लि. यांची पांजरपोळ ते घाटकोपर या प्रकल्पाचे कंत्राटदार म्हणून नेमणूक करण्यात आली. त्यानुसार मे.जे.कुमार इन्फ्राप्रोजेक्टस् लि. यांना दिनांक ३० ऑगस्ट, २००९ रोजी कार्यारंभ आदेश देण्यात आला. मुळच्या प्रस्तावानुसार कामाचा खर्च रु.१६८.०२ कोटी एवढा होता. पांजरपोळ ते चेंबूर मानर्खुद या प्रकल्पाचे काम प्रगतीपथावर असताना काही अतिरिक्त बाबी उपस्थित झाल्यामुळे व कंत्राटातील काही बाबींच्या परिणामामध्ये वाढ झाल्यामुळे

..२२/-

मूळ प्रकल्पाच्या खर्चात वाढ झाली आहे. या वाढीव व्याप्तीमुळे तसेच सविस्तर संकल्पनाचे वेळी झालेल्या बदलामुळे सदर प्रकल्पाच्या कामाचे सुधारीत अंदाजपत्रक कार्यकारी समितीच्या २२९व्या बैठकीत मंजुर केलेल्या निविदांतील तरतूदीनुसार तयार करण्यात आले असून कामांवरील खर्चाचा तपशील पुढीलप्रमाणे :

| अ.क्र. | तपशील | कामाची रक्कम (रु.कोटी) | बोगदा ते पांजरपोळ जंक्शन मधील वाढीव कामाचा खर्च (रु.कोटी) | एकूण खर्च (रु.कोटी) |
|---|---|---|---|---|
| १) | कराराप्रमाणे सुधारित खर्च (३.३३%) | १६८.७८ | ४३.७५ | २१२.५३ |
| २) | अतिरिक्त बाबींवरील खर्च | २१.७९ | ६.४१ | २८.२० |
| | **खर्च** | १९०.५७ | ५०.१६ | २४०.७३ |
| ३) | भावातील चढ उताराकरिता तरतूद | ४२.२० | १०.९४ | ५३.१४ |
| | **एकूण खर्च** | २३२.७७ | ६१.१० | २९३.८७ |

प्रकल्पातील अतिरिक्त बाबी तसेच वाढीव काम याबद्दल मुख्य अभियंता श्री.सबनीस यांनी माहिती दिली व त्या अनुषंगाने प्रकल्प प्रगतीपथावर असतांनाच यासंबंधी वाढीव किंमतीस मान्यता मिळणेसाठी प्रस्ताव असल्याचे निदर्शनास आणले.

यावर चर्चा करतांना श्री. द.म.सुकथनकर, सदस्य, कार्यकारी समिती यांनी सदर बाब सुधारीत किंमतीच्या मंजूरीसाठी प्रकल्प प्रगतिपथावर असतांना आणणे योग्य असल्याचे मत व्यक्त केले.

चर्चेनंतर, बाब टिप्पणीतील प्रस्ताव मान्य करुन कार्यकारी समितीने पुढील ठराव मंजूर केला :-

<u>ठराव क्र. १२१८ :</u>

"**असा ठराव करण्यात** येत आहे की, मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण अधिनियम, १९७४ च्या कलम ७ चे उपकलम (३) चे पोट-कलम (तीन) अन्वये प्राप्त झालेल्या अधिकारांचा आणि याबाबत त्यास सहाय्यभूत होणा-या इतर सर्व अधिकारांचा वापर करुन कार्यकारी समिती याद्वारे, पुढीलप्रमाणे मान्यता देत आहे:- १) आणिक-पांजरपोळ जोडरस्त्याच्या कामातील बोगदा ते पांजरपोळ जंक्शनच्या निविदेतील मंजूर at grade रस्त्याच्या प्रस्तावासह पांजरपोळ जंक्शन

येथे दुस-या स्तरावर नेणेसाठी आवश्यक त्या उन्नत मार्गाचे काम (बोगदा ते पांजरपोळ जंक्शनमध्ये) करणे २) आणिक-पांजरपोळ जोडरस्त्याच्या कामातील बोगदा ते पांजरपोळ जंक्शनपर्यंतच्या उन्नत मार्गाचे काम तसेच सर्व्हिस रोडचे काम पांजरपोळ ते चेंबूर मानखुर्द जोडरस्त्याचे ठेकेदार मे.जे.कुमार इन्फ्राप्रोजेक्टस लिमिटेड यांचेकडून करुन घेणे तसेच ३) या बदलांमुळे होणा-या वाढीव खर्चास रु.१२५.८५ कोटीस मंजूरी.

"**असाही ठराव करण्यात येत आहे की,** खालील तक्तात दिल्याप्रमाणे रकमेस (रु.६१.१० कोटी बोगदा ते पांजरपोळ जंक्शनपर्यंत व रु. २३२.७७ कोटी पांजरपोळ जंक्शन ते चेंबुर मानखुर्द लिंक रोड) असे एकूण रु.२९३.८७ कोटी सुधारीत रकमेच्या कामास मंजूरी प्रदान करण्यात येत आहे :-

| कामाचे नाव | मंजूर निविदेची रक्कम (रु. कोटी) | कामाची सुधारीत रक्कम (रु.कोटी) | वाढ (रु.कोटी) | शेकडा वाढ |
|---|---|---|---|---|
| पांजरपोळ जंक्शन ते चेंबूर मानखुर्द जोडरस्ता | १६८.०२ | २९३.८७ | १२५.८५ | ७४.९०% |

"**आणखी असा ठराव करण्यात येत आहे की,** सदर सुधारित अंदाजपत्रकीय रक्कमेच्या मर्यादित राहून देयके अदा करण्यास महानगर आयुक्त यांना प्राधिकृत करण्यात येत आहे.

"**आणखी असाही ठराव करण्यात येत आहे की,** वरील ठरावाची अंमलबजावणी करण्यासंबंधी आवश्यक ती पुढील सर्व कार्यवाही करण्यास महानगर आयुक्त यांना प्राधिकृत करण्यात येत आहे."

**<u>पटल बाब क्र.२:</u> <u>मुंबई नागरी विकास प्रकल्प - फिरता निधी : सहामाही व्यवस्थापन अहवाल. दिनांक ०१ एप्रिल, २०१२ ते दिनांक ३० सप्टेंबर, २०१२.</u>**

मुंबई नागरी विकास प्रकल्प - फिरता निधीच्या दिनांक ०१ एप्रिल, २०१२ ते दिनांक ३० सप्टेंबर, २०१२ या सहामाही व्यवस्थापन अहवालाची नोंद कार्यकारी समितीने घेतली.

त्यानंतर, अध्यक्षांचे आभार मानून बैठकीचे कामकाज समाप्त करण्यात आले.

————XOX————